# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

दुरध्वनी क्र.२३३३५३६-४०, २३४८००१-०५

E-mail contact@chhsambhajinagarmc.org
estl@chhsambhajinagarmc.org


जा.क्र.मनपा/साप्र(आस्था-१)/२०२६/१५५६. दिनांक - ०४/०९/२०२६.

**सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत.**

**- : जाहिरात : -**

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३) दिनांक १० जून २०२५ नुसार खालील विवक्षित कामांसाठी शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने ११ महिन्यांसाठी पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. संबंधितांना ज्या कामासाठी अर्ज करावयाचा आहे त्या कामाचा उल्लेख करुन आवश्यक कागदपत्रांसह दि.१०/०९/२०२६ पर्यंत लेखी अर्ज "सामान्य प्रशासन विभाग, मुख्य प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका" येथे दाखल करावेत.

| अ क्र | विवक्षित कामाचे स्वरुप व पदाचे नांव | अर्हता व प्राधान्य | पद संख्या |
|---|---|---|---|
| १ | प्राणिसंग्रहालयातील प्राण्यांची देखभाल व उपचार करणे, अहवाल तयार करणे व नोंदी ठेवणे (पशु शल्य चिकित्सक) | मान्यताप्राप्त विद्यापीठाची पशुवैद्यकीय शास्त्रातील पदवी/ पदव्युत्तर पदवी.<br>ब) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था / खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील कामाचा किमान ३ वर्षांचा अनुभव आवश्यक. | ०१ |
| २ | प्राणिसंग्रहालयातील प्राण्यांवर उपचार व शस्त्रक्रिया करणे (पशुवैद्यकीय अधिकारी) | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पशुवैद्यकीय शास्त्रातील पदव्युत्तर पदवी/ संबंधित विषयातील पदवीधारक.<br>ब) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था / खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील कामाचा किमान २ वर्षांचा अनुभव आवश्यक. | ०१ |

**सर्वसाधारण अटी :-**

१. सदर नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात राहील.
२. उपरोक्त नमूद विवक्षित कामासाठी वरील नमूद केलेली अर्हता व संबंधित कामाचा किमान तीन वर्षांचा अनुभव ही पूर्वअट ठेवण्यात येत आहे. (अर्जासोबत अनुभव प्रमाणपत्र अथवा सदर पदावरील आदेश व कार्यकाळ)
३. विवक्षित कामाचे स्वरुप आणि व्याप्ती विचारात घेऊन ते काम पूर्ण करण्याचा कालावधी निश्चित करुन देण्यात येईल. सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एकावेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात येईल. परंतू नियुक्तीस वाढीव कालावधीकरिता मुदतवाढ द्यावयाचे झाल्यास एकूण कालावधी तीन वर्षांपेक्षा अधिक असणार नाही.
४. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांविरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरणे नसावे याबाबत त्यांनी ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले आहे,त्या संबंधित कार्यालयाकडून तसे प्रमाणपत्र घेऊन सादर करणे बंधनकारक राहील.

..२..

५. क्षेत्रीय स्तरावर करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांच्या सेवाकाळामध्ये काही नैसर्गिक अपघात व काही आजार उद्भवल्यास हे कार्यालय बांधिल राहणार नाही.

६. सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्यांची विहित कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणूक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी मिळत असलेले मुळ निवृत्तीवेतन (अंशराशीकृत मुल्य विचारात न घेता) व त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणाऱ्या रकमेएवढी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल.

७. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

८. असा सेवानिवृत्त अधिकारी वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकेल.

९. असा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक,मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा. तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

१०. आपत्कालीन काळात रात्री-अपरात्री गरजेनुसार हजर राहून सर्व कामे करावी लागतील.

११. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधितांची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडुन घेण्यात येईल. तसेच सदर नेमणूक करार पध्दतीने असून सदरील नेमणुकीमुळे कायम सेवेचा कोणताही अधिकार प्राप्त होणार नाही. तथा या आशयाची मागणी राहणार नाही,असे हमीपत्र अधिकाऱ्याने सादर करणे बंधनकारक राहील.

१२. अशा अधिकाऱ्यांविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसल्याबाबत संबंधित कार्यालयीन विभागाचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

१३. नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१४.असा अधिकारी त्याच्यावर सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल,अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.

१५. अशा अधिकारी यांनी Conflict of Interest जाहीर करणे आवश्यक राहील.

१६. अशा अधिकाऱ्यांना आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ते व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

१७.अशा करार पध्दतीवरील अधिकारी यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

१८.करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार राहणार नाही.

१९. नियुक्ती अधिकारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. तसेच महानगरपालिकेच्या गरजेनुसार आवश्यक कामे त्यांच्याकडे सोपवल्यास सदर कामे करणे बंधनकारक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्ती प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.

Digitally signed by
RANJEET A PATIL
Date: 04-09-2026
13:32:58

**मा.आयुक्त यांच्या मान्यतेनुसार.**

(रणजीत आ.पाटील)
अतिरिक्त आयुक्त-१
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

Digitally signed by
PRASHANT JAGDISH HISVANKAR
Date: 03-09-2026 14:53:27

Digitally signed by
SHRIKANT SHRIDHARRAO VAIDYA
Date: 04-09-2026 10:29:55

# अर्जाचा नमुना

## सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा विविध कामांकरिता करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबतचा अर्ज.

प्रति,

मा.आयुक्त,
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका,
छत्रपती संभाजीनगर - ४३१००१.

अर्ज करावयाच्या विवक्षित कामाचे :- ------------------------------------------------

स्वरुप व पदाचे नांव ------------------------------------------------

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने मी विनंतीपूर्वक अर्ज करतो/करते की,मी सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय दि.१०/०६/२०२५ मधील अटी व शर्ती पूर्ण करीत असून वरील विषयात नमूद केलेल्या पदावर काम करण्यास इच्छूक असून माझी माहिती खाली नमूद केल्यानुसार सादर करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण नांव | |
| २) | पत्रव्यवहाराचा पत्ता/संपर्क दुरध्वनी / मोबाईल क्रमांक/Email ID (अनिवार्य) | |
| ३) | सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद व विभाग | |
| ४) | शासकीय सेवेत आल्याचा दिनांक /शासकीय सेवेत आल्यापासून सेवानिवृत्तीपर्यंत धारण केलेली पदे व कार्यालय | |
| ५) | सेवानिवृत्तीचा दिनांक | |
| ६) | जन्म दिनांक | |
| ७) | अर्जाच्या दिनांकास पूर्ण वय | |
| ८) | सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेले वेतन (संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र) | |
| ९) | अर्जदार सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित अथवा प्रलंबित नसल्याबाबतचे संबंधित विभागाचे प्रमाणपत्र | |
| १०) | सद्यस्थितीत मिळत असलेले सेवानिवृत्तीवेतन (संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्रासह) | |

स्थळ :-

दिनांक :- स्वाक्षरी